Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
दैनिक
सत्याचे प्राईम्स
# जन सम्राट टाईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। शुक्रवार, दि. ८ मे २०२६ । वर्ष १ । अंक ३३ । पाने २।
DIGITAL EDITION



खरीप हंगामासाठी ११ मे रोजी बैठक

(पान २ वर)

» Selected

### आज इयत्ता दहावीचा निकाल



पुणे । महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी -मार्च 2026 मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल आज दिनांक आठ मे रोजी जाहीर करण्यात येणार आहे. याबाबत मंडळाच्यावतीने प्रसिद्धी पत्रक काढून माहिती देण्यात आली आहे. फेब्रवारी मार्च 2026 मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा अर्थात इयत्ता दहावीचा निकाल उद्या जाहीर होणार आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने देण्यात आलेल्या माहितीनुसार इयत्ता दहावीचा निकाल हा मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर आज उपलब्ध होणार आहेत.

## भगवान गौतम बुद्धांच्या पावन भूमीचे दर्शन घेण्याची सुवर्णसंधी

# रुपयाही खर्च न करता बौद्ध गया दर्शन!

## सरकारचा मोठा निर्णय! राहणं, जेवण, प्रवास मोफत

जन सम्राट टाईम्स

**मुंबई| प्रतिनिधी : भगवान गौतम बुद्धांच्या पावन भूमीचे दर्शन घेण्याची सुवर्णसंधी आता भाविकांना उपलब्ध होणार आहे. या यात्रेसाठी छत्रपती संभाजीनगर, नागपूर, दादर (मुंबई) येथून विशेष रेल्वे व्यवस्था करण्यात आली आहे. राज्य सरकारच्या सामाजिक न्याय विभागाच्या वतीने एक मोठा निर्णय घेण्यात आला आहे.**

बौद्ध तीर्थक्षेत्र विशेष रेल्वे यात्रा – बौद्ध गया दर्शन” कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ही पवित्र यात्रा मंत्री संजयजी शिरसाट यांच्या नेतृत्वात आयोजित करण्यात आली आहे. राज्य सरकारच्या सामाजिक न्याय विभागाच्या वतीने एक मोठा निर्णय घेण्यात आला आहे. “बौद्ध तीर्थक्षेत्र विशेष रेल्वे यात्रा – बौद्ध गया दर्शन” कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ही पवित्र यात्रा मंत्री संजयजी शिरसाट यांच्या नेतृत्वात आयोजित करण्यात आली आहे. भगवान गौतम बुद्धांच्या पावन भूमीचे दर्शन घेण्याची सुवर्णसंधी



आता भाविकांना उपलब्ध होणार आहे. या यात्रेसाठी छत्रपती संभाजीनगर, नागपूर, दादर (मुंबई) येथून विशेष रेल्वे व्यवस्था करण्यात आली आहे. यात्रेदरम्यान भाविकांसाठी आरामदायी रेल्वे प्रवास, निवास व्यवस्था, भोजन व्यवस्था, स्थानिक पर्यटन व दर्शन व्यवस्था अशा सर्व सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. बुद्धांच्या शांतता, समता आणि मानवतेच्या संदेशाला अभिवादन करत, अधिकाधिक नागरिकांनी या पवित्र यात्रेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सरकारकडून करण्यात आले आहे. एकूण तीन टप्प्यांत ही बौद्ध गया दर्शन यात्रा सुरू होणार आहे. पहिला टप्पा 15 मे रोजी सुरू होईल. दुसरा टप्पा 25 मे रोजी सुरू होईल. तर तिसरा टप्पा 3 जून रोजी सुरू होईल. पहिला टप्पा हा छत्रपती संभाजीनगर ते बौद्ध गया अले. दुसरा टप्पा नागपूर ते बौद्ध गया असा असेल तर तिसरा टप्पा दादर (मुंबई) ते बौद्ध गया असा असेल. या प्रवासादरम्यान निवास, भोजन तसेच रेल्वे प्रवास मोफत

### बौद्ध तीर्थक्षेत्र विशेष रेल्वे यात्रा

बौद्ध तीर्थक्षेत्र विशेष रेल्वे यात्रा – बौद्ध गया दर्शन” कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ही पवित्र यात्रा मंत्री संजयजी शिरसाट यांच्या नेतृत्वात आयोजित करण्यात आली आहे. राज्य सरकारच्या सामाजिक न्याय विभागाच्या वतीने एक मोठा निर्णय घेण्यात आला आहे. “बौद्ध तीर्थक्षेत्र विशेष रेल्वे यात्रा – बौद्ध गया दर्शन” कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ही पवित्र यात्रा मंत्री संजयजी शिरसाट यांच्या नेतृत्वात आयोजित करण्यात आली आहे. भगवान गौतम बुद्धांच्या पावन भूमीचे दर्शन घेण्याची सुवर्णसंधी आता भाविकांना उपलब्ध होणार आहे. या यात्रेसाठी छत्रपती संभाजीनगर, नागपूर, दादर (मुंबई) येथून विशेष रेल्वे व्यवस्था करण्यात आली आहे. यात्रेदरम्यान भाविकांसाठी आरामदायी रेल्वे प्रवास, निवास व्यवस्था, भोजन व्यवस्था, स्थानिक पर्यटन व दर्शन व्यवस्था अशा सर्व सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. समता आणि मानवतेच्या संदेशाला अभिवादन करत, अधिकाधिक नागरिकांनी या पवित्र यात्रेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सरकारकडून करण्यात आले आहे.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

## उपमुख्यमंत्री शिंदेंच्या हेलिकॉप्टरची आपत्कालीन लँडिंग

### जुहू विमानतळावर थरारक प्रसंग

जन सम्राट टाईम्स

**मुंबई/ठाणे | विशेष प्रतिनिधी:** राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, यांच्या हेलिकॉप्टरला गुरुवारी भीषण धुळीच्या वादळाचा तडाखा बसल्याने काही काळ तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली. खराब हवामान, कमी झालेली दृश्यमानता आणि जोरदार वाऱ्यामुळे हेलिकॉप्टर हवेतच अडचणीत सापडले होते. मात्र, वैमानिकाने प्रसंगावधान राखत हेलिकॉप्टरचे जुहू विमानतळावर सुरक्षित आपत्कालीन लँडिंग केले. या घटनेत उपमुख्यमंत्री शिंदे सुखरूप असून मोठा अनर्थ टळला आहे. गुरुवारी दुपारच्या सुमारास ठाणे आणि मुंबई परिसरात अचानक धुळीचे प्रचंड वादळ निर्माण झाले. काही मिनिटांतच संपूर्ण वातावरण धुळीने व्यापले गेले आणि दृश्यमानता अत्यंत कमी झाली. जोरदार वाऱ्यामुळे शहरातील अनेक भागांत नागरिकांची तारांबळ उडाली. रस्त्यांवर धुळीचे लोट उसळल्याने वाहतुकीचा वेग मंदावला, तर काही ठिकाणी झाडांच्या फांद्या तुटणे आणि किरकोळ पडझडीच्या घटनाही घडल्या. याच दरम्यान उपमुख्यमंत्री शिंदे यांचे हेलिकॉप्टर नियोजित प्रवासावर असताना अचानक या वादळाच्या विळख्यात सापडले. हवेत निर्माण



झालेल्या प्रतिकूल परिस्थितीमुळे वैमानिकाला मार्गक्रमण करताना अडचणी येऊ लागल्या.

#### घटनेत कोणतीही जीवितहानी नाही

दृश्यमानता कमी झाल्याने काही काळ परिस्थिती गंभीर बनली होती. मात्र, तातडीने परिस्थितीचे मूल्यांकन करून वैमानिकाने हेलिकॉप्टरला जुहू ॲण्ड्रोम येथे सुरक्षित उतरवण्याचा निर्णय घेतला. घटनेत कोणतीही जीवितहानी नाही हेलिकॉप्टरच्या या थरारक आपत्कालीन लँडिंगनंतर काही काळ प्रशासन आणि सुरक्षा यंत्रणांमध्ये सतर्कतेचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने, या संपूर्ण घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही आणि उपमुख्यमंत्री सुखरूप असल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली.

## समाजाच्या उन्नतीसाठी सक्षम नेतृत्व उभे करणे काळाची गरज : चरणसिंग टाक

### अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेसची पुण्यात बैठक; संघटनात्मक बळकटीकरणावर भर

जन सम्राट टाईम्स

**पुणे | प्रतिनिधी :** अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेस संघटनेची महत्त्वपूर्ण बैठक पुणे येथील शासकीय विश्रामगृह सर्किट हाऊसमध्ये उत्साहात पार पडली. या बैठकीत मेहतर-वाल्मिकी समाजातील विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी संघटनात्मक नेतृत्व अधिक सक्षम करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष Charan Singh Tak यांनी केले. बैठकीत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना टाक म्हणाले की, अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेस संघटना उभी करण्यासाठी सरदार बुटासिंग, वसंतराव चव्हाण, वासुदेव चांगरे यांच्यासह विविध राज्यांतील समाजनेत्यांनी मोठे योगदान दिले आहे. अनेक वर्षांच्या संघर्षातून उभी राहिलेली ही संघटना अधिक प्रभावीपणे पुढे नेण्यासाठी कार्यकर्त्यांनी एकजुटीने नेतृत्वाला



बळ द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय प्रगतीसाठी आरक्षणातील वर्गीकरणात योग्य वाटा मिळवण्यासाठी जागरूक राहणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. “संघटनेत एक सक्षम नेता निवडा आणि त्यांच्या नेतृत्वाखाली समाजहितासाठी लढा उभारा,” असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले. या बैठकीत समाजातील विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. विशेषतः शिक्षण, रोजगार, सामाजिक न्याय आणि संघटनात्मक विस्तार या विषयांवर कार्यकर्त्यांनी आपली मते मांडली. समाजातील युवक आणि महिलांनीही सक्रिय सहभाग घेऊन संघटनेच्या कार्यात अधिक योगदान देण्याचा निर्धार व्यक्त केला. बैठकीला डॉ. अनुपम बेगी, सतीश लालबिगे, कविराज संघेलिया, दीपक चव्हाण, दीपक निनारिया, विनोद निनारिया, महेंद्र चव्हाण, ज्ञानेश्वर माने, परवीन लालबिगे, रेखा राजे, संजय बेगी, विक्रांत विशिष्ट, सूर्यकांत यादव, रवी बेंगळे, तेजस्विनी सडेकर, धर्मेंद्र सडेकर आदी मान्यवर उपस्थित होते. नसरापूर घटनेचा तीव्र निषेध दरम्यान, अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेसच्या वतीने नसरापूर येथे चिमुकलीवरील अत्याचार आणि हत्येच्या घटनेचा तीव्र निषेध करण्यात आला. या प्रकरणातील आरोपीला फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी ठाम मागणी संघटनेने केली. समाजातील महिलांच्या आणि बालकांच्या सुरक्षेसाठी कठोर कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली.

## यशवंतराव चव्हाण स्मारक खर्चाची चौकशीची मागणी

### “जनतेच्या कराच्या पैशाचा हिशोब द्या” अशी नागरिकांची भूमिका

जन सम्राट टाईम्स

**पिंपरी चिंचवड | प्रतिनिधी** निगडी प्राधिकरण येथील यशवंतराव चव्हाण स्मारक समिती यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासनाकडून देण्यात आलेल्या तब्बल १६ कोटी रुपयांच्या आर्थिक मदतीच्या वापराबाबत आता प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे. या निधीचा नेमका कशासाठी आणि कोणत्या कामांसाठी वापर करण्यात आला, याचा सविस्तर ऑडिट अहवाल जाहीर करावा, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात आली आहे. यासंदर्भात महापालिका आयुक्तांकडे लेखी निवेदन सादर करण्यात





आले असून, संबंधित निधीच्या वापराबाबत स्वतंत्र चौकशी करण्याची मागणीही करण्यात आली आहे. “सार्वजनिक निधी हा जनतेच्या कराच्या पैशातून जमा होतो. त्यामुळे त्या प्रत्येक रुपयाचा पारदर्शक हिशोब नागरिकांना मिळालाच पाहिजे,” अशी भूमिका निवेदनातून मांडण्यात आली आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, स्मारक समितीला देण्यात आलेल्या १६ कोटी रुपयांच्या निधीतून कोणती कामे करण्यात आली, त्या कामांची मंजुरी प्रक्रिया काय होती, खर्चाचे तपशील कोणते आहेत आणि प्रत्यक्षात कामांची अंमलबजावणी कितपत झाली, याची माहिती अद्याप सार्वजनिक करण्यात आलेली नाही. त्यामुळे या प्रकरणात आर्थिक अनियमितता किंवा निधीच्या गैरवापराबाबत शंका निर्माण होत असल्याचेही नागरिकांनी म्हटले आहे. “जनतेच्या पैशाचा हिशोब आवश्यक” नागरिकांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, महापालिका हद्दीतील सर्वसामान्य नागरिक मालमत्ता कर आणि इतर करांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात महसूल भरत असतात. त्यामुळे सार्वजनिक निधीचा वापर पारदर्शक आणि नियमबद्ध पद्धतीने झाला पाहिजे. अन्यथा जनतेचा प्रशासनावरील विश्वास डळमळीत होऊ शकतो. या निवेदनामुळे आता महापालिका प्रशासन काय भूमिका घेते आणि संबंधित स्मारक समितीकडून निधीच्या वापराबाबत खुलासा केला जातो का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## खरीप हंगामासाठी ११ मे रोजी जळगावात बैठक

### पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आढावा

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** पश्चिम खरीप हंगाम २०२६ च्या पार्श्वभूमीवर जळगाव जिल्ह्यातील कृषी नियोजनाला गती देण्यासाठी जिल्हास्तरीय महत्त्वाची आढावा बैठक सोमवार, ११ मे २०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी १० वाजता जिल्हा नियोजन समिती सभागृह, जळगाव येथे ही बैठक पार पडणार आहे. खरीप हंगाम सुरळीत आणि नियोजनबद्ध पार पडावा यासाठी शेतकऱ्यांना आवश्यक असलेल्या कृषी निविष्ठांचा पुरेसा साठा, त्यांची वेळेवर उपलब्धता आणि गुणवत्ता यावर या बैठकीत विशेष भर दिला जाणार आहे.

बियाणे, रासायनिक खते, किटकनाशके तसेच अन्य कृषी साहित्याच्या पुरवठ्याचा सविस्तर आढावा घेऊन संभाव्य अडचणींवर उपाययोजना निश्चित करण्यात येणार आहेत. याशिवाय बाजारात बनावट किंवा निकृष्ट दर्जाच्या कृषी साहित्याची विक्री रोखण्यासाठी गुणवत्ता नियंत्रण यंत्रणा अधिक प्रभावी करण्याबाबतही चर्चा होणार आहे.

शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी प्रशासन कोणती पावले उचलणार, याकडे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे लक्ष



लागले आहे. बैठकीत कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, पीक प्रात्यक्षिके, जनजागृती मोहिमा तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराबाबत सादरीकरण करण्यात येणार आहे. हवामान बदल, पाण्याचे नियोजन आणि उत्पादनवाढ यासंदर्भातही मार्गदर्शन होण्याची शक्यता आहे.

जिल्ह्यातील सर्व संबंधित लोकप्रतिनिधी, कृषि विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच संलग्न विभागांचे अधिकारी या बैठकीला उपस्थित राहणार आहेत. खरीप हंगामाच्या तयारीचा सखोल आढावा घेऊन शेतकऱ्यांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाकडून समन्वयात्मक नियोजन केले जाणार असल्याची माहिती कृषि विभागाने दिली आहे. दरम्यान, आगामी खरीप हंगामात शेतकऱ्यांना कोणतीही अडचण भासू नये, यासाठी प्रशासन सज्ज असल्याचा दावा करण्यात येत असून, या बैठकीकडे संपूर्ण जिल्ह्यातील शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.

#### कृषी साहित्याच्या पुरवठ्याचा आढावा

बियाणे, रासायनिक खते, किटकनाशके तसेच अन्य कृषी साहित्याच्या पुरवठ्याचा सविस्तर आढावा घेऊन संभाव्य अडचणींवर उपाययोजना निश्चित करण्यात येणार आहेत. याशिवाय बाजारात बनावट किंवा निकृष्ट दर्जाच्या कृषी साहित्याची विक्री रोखण्यासाठी गुणवत्ता नियंत्रण यंत्रणा अधिक प्रभावी करण्याबाबतही चर्चा होणार आहे. शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी प्रशासन कोणती पावले उचलणार, याकडे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज

## नांदेडच्या भूमिपुत्राची नाशिक औद्योगिक क्षेत्रात यशस्वी भरारी

### कौशल्याच्या जोरावर इंजिनियर जयपाल शिरसाठे यांनी निर्माण केली वेगळी ओळख

जन सम्राट टाईम्स

**नाशिक | प्रतिनिधी** ग्रामीण भागातील युवकांनी जिद्द, चिकाटी आणि शिक्षणाच्या जोरावर उद्योग क्षेत्रात मोठे यश संपादन करू शकते, याचे प्रेरणादायी उदाहरण म्हणजे नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील तांदळी गावचे सुपुत्र इंजिनियर जयपाल दिगंबर शिरसाठे होत. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून पुढे येत त्यांनी नाशिकच्या औद्योगिक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाची वेगळी छाप निर्माण केली आहे. सध्या इंजिनियर जयपाल शिरसाठे हे महाराष्ट्र औद्योगिक क्षेत्रातील एचएस हायस्प्रिट कमर्शियल व्हेन्चर प्रा. लि. कंपनीच्या प्रिओरिटी ट्रायवर्ड विभागात व्यवस्थापक तथा उत्पादन विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत नुकतीच त्यांची सदिच्छा भेट घेण्यात आली. शिक्षणाच्या माध्यमातून मोठी स्वप्ने पाहावीत आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांद्वारे ती पूर्ण करावीत, असा प्रेरणादायी संदेश यावेळी देण्यात आला. या सदिच्छा भेटीदरम्यान स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक संघशिल भद्रे उर्फ एस. एन. नांदेडकर सर, जाधव सर, युवराज सर तसेच ब्रदर सुमेध शिरसाठे उपस्थित होते. इंजिनियर जयपाल शिरसाठे यांचा संघर्षमय प्रवास आज अनेक ग्रामीण युवकांसाठी प्रेरणादायी ठरत असून, “परिस्थिती नव्हे तर मेहनत आणि ध्येय महत्त्वाचे असते,” हे त्यांनी आपल्या कार्यातून सिद्ध करून दाखवले आहे.तांत्रिक कौशल्य, व्यवस्थापन



क्षमता आणि नेतृत्वगुणांच्या जोरावर त्यांनी उद्योग क्षेत्रात स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून मोठी स्वप्ने पाहावीत आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांद्वारे ती पूर्ण करावीत, असा प्रेरणादायी संदेश यावेळी देण्यात आला. या सदिच्छा भेटीदरम्यान स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक संघशिल भद्रे उर्फ एस. एन. नांदेडकर सर, जाधव सर, युवराज सर तसेच ब्रदर सुमेध शिरसाठे उपस्थित होते. इंजिनियर जयपाल शिरसाठे यांचा संघर्षमय प्रवास आज अनेक ग्रामीण युवकांसाठी प्रेरणादायी ठरत असून, “परिस्थिती नव्हे तर मेहनत आणि ध्येय महत्त्वाचे असते,” हे त्यांनी आपल्या कार्यातून सिद्ध करून दाखवले आहे.

#### उद्योग क्षेत्रात मोठे यश


भागातील युवकांनी जिद्द, चिकाटी आणि शिक्षणाच्या जोरावर उद्योग क्षेत्रात मोठे यश संपादन करू शकते, याचे प्रेरणादायी उदाहरण म्हणजे नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील तांदळी गावचे सुपुत्र इंजिनियर जयपाल दिगंबर शिरसाठे होत.

#### जयपाल शिरसाठे यांचा संघर्षमय प्रवास

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून पुढे येत त्यांनी नाशिकच्या औद्योगिक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाची वेगळी छाप निर्माण केली आहे. सध्या इंजिनियर जयपाल शिरसाठे हे महाराष्ट्र औद्योगिक क्षेत्रातील एचएस हायस्प्रिट कमर्शियल व्हेन्चर प्रा. लि. कंपनीच्या प्रिओरिटी ट्रायवर्ड विभागात व्यवस्थापक तथा उत्पादन विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत नुकतीच त्यांची सदिच्छा भेट घेण्यात आली. तांत्रिक कौशल्य, व्यवस्थापन क्षमता आणि नेतृत्वगुणांच्या जोरावर त्यांनी उद्योग क्षेत्रात स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. आपल्या कार्यतत्परतेमुळे आणि जबाबदारीच्या भावनेमुळे ते सहकाऱ्यांमध्येही विशेष आदराचे स्थान मिळवत आहेत. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

» Selected

## २०२९ मध्ये सुनेत्रा पवार मुख्यमंत्री?



मुंबई | बारामती विधानसभा पोटनिवडणुकीतील विक्रमी विजयामुळे राज्याच्या राजकारणात चर्चेच्या केंद्रस्थानी आलेल्या सुनेत्रा पवार यांच्याबाबत आता मोठी राजकीय चर्चा सुरू झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे युवानेते जय पवार यांनी केलेल्या सूचक विधानामुळे २०२९ च्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नव्या राजकीय समीकरणांची चर्चा रंगू लागली आहे. मुंबईत माध्यमांशी संवाद साधताना जय पवार यांनी,सुनेत्रा पवार यांनी बारामती विधानसभा मतदारसंघातून मुख्यमंत्रिपदाच्या उमेदवार म्हणून निवडणूक लढवावी, अशी आमची इच्छा आहे," असे विधान केले. त्यांच्या या वक्तव्यामुळे राज्यातील राजकीय वर्तुळात तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. नुकत्याच झालेल्या बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत सुनेत्रा पवार यांनी मोठ्या मताधिक्याने विजय मिळवत आपली राजकीय ताकद दाखवून दिली.

# कासोद्यात कृषी विभागाचे 'ऑपरेशन HTBT' यशस्वी

## चारचाकीसह मोठा साठा ताब्यात, अवैध रॅकेटचा शोध सुरू

जन सम्राट टाईम्स

**कासोदा | प्रतिनिधी:** एरंडोल तालुक्यातील कासोदा परिसरात प्रतिबंधित HTBT कापूस बियाण्यांची चोरटी वाहतूक करणाऱ्या रॅकेटवर कृषी विभागाने मोठी धडक कारवाई करत तब्बल १० लाख रुपयांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे अवैध बियाणे विक्रेत्यांचे धाबे दणाणले असून संपूर्ण परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कासोदा परिसरात विनापरवाना आणि केंद्र सरकारने प्रतिबंधित केलेल्या HTBT कापूस बियाण्यांची मोठ्या प्रमाणावर गुप्तपणे वाहतूक होत असल्याची खात्रीलायक माहिती कृषी विभागाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी परिसरात सापळा रचत संशयित वाहनांवर पाळत ठेवली. दरम्यान, संशयास्पद हालचाली करणारी एक चारचाकी गाडी अडवून तिची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान वाहनात मोठ्या प्रमाणावर HTBT कापूस बियाण्यांची पाकिटे आढळून आली. अधिकाऱ्यांनी तत्काळ कारवाई करत सुमारे ४ लाख ८० हजार रुपये किमतीची प्रतिबंधित बियाणे आणि वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली चारचाकी गाडी जप्त केली. एकूण जप्त मुद्देमालाची किंमत १० लाख रुपयांहून अधिक असल्याचे सांगण्यात आले. HTBT बियाण्यांमुळे शेतकऱ्यांना धोका



HTBT (हर्बिसाइड टॉलरंट बीटी) कापूस बियाणे भारतात लागवडीसाठी अधिकृतरीत्या प्रतिबंधित आहेत. तरीदेखील काही समाजकंटक आणि बियाणे माफिया शेतकऱ्यांना जास्त उत्पादनाचे आमिष दाखवून या बियाण्यांची अवैधरित्या विक्री करत असल्याचे समोर आले आहे. कृषी तज्ज्ञांच्या मते, अशा बियाण्यांच्या वापरामुळे जमिनीचा पोत खराब होण्याचा धोका निर्माण होतो. तसेच उत्पादनाबाबत कोणतीही हमी नसल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसण्याची शक्यता असते. याशिवाय, प्रतिबंधित बियाण्यांची लागवड केल्यास संबंधित शेतकऱ्यांवर कायदेशीर कारवाई होऊ शकते. त्यामुळे अधिकृत परवानाधारक विक्रेत्यांकडूनच बियाणे खरेदी करावीत, असे आवाहन कृषी विभागाने पुन्हा एकदा केले आहे. या प्रकरणात केवळ वाहतूक करणाऱ्यांवरच नव्हे, तर या अवैध साखळीमागील मुख्य सूत्रधारांचा शोध घेण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. कृषी विभाग आणि पोलीस प्रशासन संयुक्तपणे तपास करत असून, या रॅकेटमध्ये आणखी कोणाचे हात गुंतले आहेत याचा शोध घेतला जात आहे. कृषी विभागाच्या या धडक कारवाईमुळे जिल्ह्यातील अवैध बियाणे विक्रेत्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारच्या कारवाया आणखी तीव्र केल्या जाणार असल्याचे संकेत प्रशासनाकडून देण्यात आले आहेत.

### शेतकऱ्यांना आवाहन

"जास्त उत्पादनाच्या आमिषाला बळी पडू नका. अधिकृत आणि प्रमाणित बियाण्यांचाच वापर करा," असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी अशा अवैध व्यवहारांवर कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

जन सम्राट टाईम्स — विशेष बातमी

# घरफोडी करणारी टोळी पोलिसांच्या जाळ्यात!

## मध्यप्रदेशातून ६ संशयित जेरबंद

। जन सम्राट टाईम्स ।



**जळगाव | प्रतिनिधी :** जळगाव शहरात वाढत्या घरफोड्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असताना एमआयडीसी पोलिसांनी मोठी कारवाई करत आंतरराज्य घरफोडी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. एअरपोर्टजवळील तारा बिझनेस पार्क परिसरातील १२ लाखांहून अधिक रकमेच्या घरफोडीप्रकरणी पोलिसांनी मध्यप्रदेशातील सहा संशयितांना अटक केली असून त्यांच्याकडून तब्बल ११ लाख ५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या धडक कारवाईमुळे गुन्हेगारांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. चोरट्यांनी डल्ला मारत सोन्या-चांदीचे दागिने आणि मोठी रोख रक्कम लंपास केली होती. या घटनेनंतर एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. शहरातील वाढत्या घरफोड्यांच्या पार्श्वभूमीवर या प्रकरणाला गंभीर स्वरूप प्राप्त झाले होते.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बबन आव्हाड यांनी तातडीने गुन्हे शोध पथक सक्रिय केले. तांत्रिक विश्लेषण, मोबाईल लोकेशन आणि गुप्त माहितीच्या आधारे तपास सुरू करण्यात आला. तपासादरम्यान आरोपी मध्यप्रदेशातील सेंधवा तालुक्यातील दुर्गम भागात लपून बसल्याची माहिती पोलिसांना मिळाली. हा भाग संवेदनशील आणि गुन्हेगारी हालचालींसाठी कुप्रसिद्ध असल्याने आरोपींना पकडणे पोलिसांसाठी मोठे आव्हान होते.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# मालवाहू वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार जागीच ठार!

## कुऱ्हबसतील कारकूनाचा दुर्दैवी मृत्यू

जन सम्राट टाईम्स

**पारोळा | प्रतिनिधी:** पारोळा शहरातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वर बुधवारी (दि. ६) सायंकाळी भीषण अपघात घडला. लेलँड मालवाहू वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून शहरात शोककळा पसरली आहे. मृत व्यक्तीचे नाव देविदास प्रल्हाद नाईक (वय ५३, रा. गोपाल नगर, पारोळा) असे असून ते पारोळा कृषी उत्पन्न बाजार समितीत कारकून म्हणून कार्यरत होते. मिळालेल्या माहितीनुसार, देविदास नाईक हे त्यांच्या शाईन दुचाकीने (एमएच १९ इजे ५७४४) धुळे-जळगाव रोडने शहराकडे येत होते. यावेळी समोरून धुळ्याकडे जाणाऱ्या लेलँड मालवाहू वाहनाने (एमएच १९ सीवाय ३२८९) त्यांच्या दुचाकीला जबर धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की नाईक यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली.अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतीस धाव घेत त्यांना रुग्णवाहिकेतून पारोळा कुटीर रुग्णालयात दाखल केले. मात्र,डॉक्टरांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. या दुर्घटनेमुळे महामार्गावर काही काळ वाहतुकीची कोंडी निर्माण झाली होती. या प्रकरणी नंदू जाधव यांनी पारोळा पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून लेलँड वाहन चालक राजेंद्र बाबुराव शिंदे (रा. आसोदा, जि. जळगाव) याच्याविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस कॉन्स्टेबल चंद्रशेखर सोनवणे करीत आहेत. देविदास नाईक यांच्या निधनामुळे पारोळा कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात शोक व्यक्त करण्यात



येत आहे. शांत, मनमिळावू आणि कर्तव्यदक्ष कर्मचारी म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे. दरम्यान, त्यांच्यावर गुरुवारी दुपारी १२ वाजता मूळ गाव मालखेडा (ता. जामनेर) येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली.

### महामार्गावर काही काळ वाहतुकीची कोंडी

हा अपघात इतका भीषण होता की नाईक यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली.अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतीस धाव घेत त्यांना रुग्णवाहिकेतून पारोळा कुटीर रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. या दुर्घटनेमुळे महामार्गावर काही काळ वाहतुकीची कोंडी निर्माण झाली होती. या प्रकरणी नंदू जाधव यांनी पारोळा पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून लेलँड वाहन चालक राजेंद्र बाबुराव शिंदे याच्याविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस कॉन्स्टेबल चंद्रशेखर सोनवणे करीत आहेत. पारोळा कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात शोक व्यक्त करण्यात येत आहे. शांत, मनमिळावू आणि कर्तव्यदक्ष कर्मचारी म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे.

# जळगाव हादरले! दारुड्या पतीचा पत्नीनेच गळा आवळून केला खून

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** जळगाव शहरातील कानळदा रोड परिसरात पती-पत्नीच्या सततच्या वादातून घडलेल्या थरारक हत्येच्या घटनेने शहर हादरले आहे. दारूच्या नशेत वारंवार त्रास देणाऱ्या पतीचा पत्नीनेच दोरीने गळा आवळून खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी पत्नीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला असून परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

मृत व्यक्तीचे नाव भरत नामदेव पाटील (वय ५८, रा. केसी पार्क, कानळदा रोड) असे असून आरोपी पत्नीचे नाव मनीषा भरत पाटील (वय ५०) आहे. दारूच्या नशेतून सुरू झाला वाद मिळालेल्या माहितीनुसार, भरत पाटील हे पत्नी आणि दोन मुलांसह केसी पार्क परिसरात वास्तव्यास होते. पत्नी एका कापड दुकानात काम करत होती, तर दोन्ही मुले एमआयडीसीतील कंपनीत नोकरीला आहेत. भरत पाटील यांना दारूचे व्यसन होते आणि ते नेहमीच नशेत पत्नी व मुलांशी वाद घालत असल्याचे समोर आले आहे. मंगळवारी रात्री सुमारे ९ वाजता मनीषा पाटील या कामावरून घरी परतल्या असता भरत पाटील हे घराच्या ओट्यावर दारूच्या नशेत बसलेले होते. घरी येताच त्यांनी पत्नीशी पुन्हा वाद घालण्यास सुरुवात केली. काही वेळातच दोघांमध्ये जोरदार भांडण झाले. संताप अनावर; दोरीने गळा आवळला वाद विकोपाला गेल्यानंतर संतापाच्या भरात मनीषा पाटील यांनी घरातील दोरीच्या सहाय्याने पतीचा गळा आवळला. त्यानंतर त्यांना पलंगावरून खाली ओढल्याने त्यांचे डोके जमिनीवर आपटले. या घटनेत त्यांच्या नाक आणि कानातून रक्तस्त्राव सुरू झाला. घटनेची माहिती मिळताच परिसरातील एका युवकाने तातडीने भरत पाटील यांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले.

# भडगाव प्रकरणावरून रोहित पवारांचा हल्लाबोल

## शक्ती कायद्याच्या अंमलबजावणीवर उपस्थित केले गंभीर प्रश्न

जन सम्राट टाईम्स

**भडगाव | प्रतिनिधी:** तीन वर्षांपूर्वी गोंडगाव येथे सात वर्षीय चिमुरडीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आली होती. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला होता. घटनेनंतर पीडित कुटुंबाला लवकर न्याय मिळावा म्हणून फास्टट्रॅक कोर्टाची घोषणा करण्यात आली होती. मात्र, तीन वर्ष उलटूनही अद्याप न्याय मिळालेला नाही, अशी खंत रोहित पवार यांनी व्यक्त केली. "फास्टट्रॅक कोर्टाचा खरोखर फायदा होतो का, हे पाहायचे असेल तर गोंडगाव प्रकरणाकडे पाहावे लागेल. तीन वर्षे झाली तरी न्याय प्रक्रिया पूर्ण झालेली नाही.

आज त्या कुटुंबाला प्रश्न पडतोय की, खरंच न्याय मिळणार का?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला. "शक्ती कायदा लागू करा" राज्य सरकारने २०१९ मध्ये आणलेला शक्ती कायदा तातडीने लागू करण्याची मागणीही त्यांनी केली. "महिला आणि लहान मुलींवरील अत्याचार रोखण्यासाठी कायद्यामध्ये आणखी कडक तरतुदी करण्याची गरज आहे. गुन्हेगारांना कठोर शिक्षेची भीती वाटली पाहिजे," असे ते म्हणाले.या प्रकरणात कोणतेही राजकारण न आणता पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देणे हाच उद्देश असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले."गरीबांना न्याय मिळतोय का?" उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा अप्रत्यक्ष उल्लेख करत रोहित पवार म्हणाले, "ज्यांच्याकडे पैसा आहे ते आपल्या कुटुंबासाठी सुरक्षा व्यवस्था उभी करू शकतात. पण गरीब माणसाचे काय? जर सत्तेत असलेल्या लोकांनाच न्याय मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागत असेल, तर सर्वसामान्य नागरिकांकडे कोण पाहणार?" महिला सुरक्षेवर गंभीर आकडेवारी राज्यातील महिला सुरक्षेबाबत बोलताना त्यांनी धक्कादायक आकडेवारी मांडली. "महाराष्ट्रात वर्षभरात महिलांबाबत ५० हजारांहून अधिक गुन्हे दाखल झाले आहेत. दररोज सुमारे १३७ गुन्हे आणि २४ बलात्काराच्या घटना घडतात. म्हणजे जवळपास प्रत्येक तासाला एक बलात्कार होतो. तसेच दरवर्षी १३ हजार लहान मुलींवर अत्याचार होतात," असे सांगत त्यांनी प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. "गुन्हेगारांना पोलिसांची भीती राहिलेली नाही का? पोलिसांना इतर कामांमध्ये गुंतवले जात असल्याने अशा गंभीर प्रकरणांकडे दुर्लक्ष होत आहे," अशी टीकाही त्यांनी केली. रोहित पवार यांच्या या दौऱ्यामुळे भडगाव प्रकरण पुन्हा चर्चेत आले असून, पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी राज्य सरकारवर दबाव वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.



### "शक्ती कायदा लागू करा"

राज्य सरकारने २०१९ मध्ये आणलेला शक्ती कायदा तातडीने लागू करण्याची मागणीही त्यांनी केली. "महिला आणि लहान मुलींवरील अत्याचार रोखण्यासाठी कायद्यामध्ये आणखी कडक तरतुदी करण्याची गरज आहे. आणता पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देणे हाच उद्देश असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा अप्रत्यक्ष उल्लेख करत रोहित पवार म्हणाले, "ज्यांच्याकडे पैसा आहे ते आपल्या कुटुंबासाठी सुरक्षा व्यवस्था उभी करू शकतात.

# जलवाहिनी फुटल्याने पाण्याची नासाडी!

## पाण्याच्या मोठ्या अपव्ययामुळे नागरिकांमधून संताप

जन सम्राट टाईम्स

नशिराबाद | प्रतिनिधी नशिराबाद येथील पोलीस स्टेशनजवळील छोटा बोगदा परिसरात एमआयडीसीची जलवाहिनी गेल्या अनेक दिवसांपासून फुटलेली असून, त्यामुळे दररोज हजारो लिटर शुद्ध पाणी रस्त्यावर वाहून जात आहे. ऐन उन्हाळ्यात सुरू असलेल्या या पाण्याच्या मोठ्या अपव्ययामुळे नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस स्टेशनपासून काही अंतरावरच ही जलवाहिनी फुटली असून सतत होणाऱ्या गळतीमुळे परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे. परिणामी रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले असून वाहनचालक आणि पादचाऱ्यांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर एकीकडे प्रशासनाकडून पाणी जपून वापरण्याचे आवाहन केले जात असताना, दुसरीकडे प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे मौल्यवान पाणी अक्षरशः रस्त्यावर वाहून जात असल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. स्थानिक नागरिकांच्या



म्हणण्यानुसार, सततच्या पाणीगळतीमुळे रस्ता निसरडा झाला असून दुचाकी घसरून अपघात होण्याचा धोका वाढला आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी या ठिकाणी वाहतूक करताना वाहनचालकांना अधिक सतर्क राहावे लागत आहे. दरम्यान, या भागातून दररोज मोठ्या प्रमाणावर नागरिकांची वर्दळ असते. त्यामुळे फुटलेल्या जलवाहिनीची तातडीने दुरुस्ती करून पाण्याची नासाडी थांबवावी, तसेच रस्त्यावरील चिखल साफ करून नागरिकांची गैरसोय दूर करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. नागरिकांनी संबंधित विभागाने या गंभीर समस्येकडे तात्काळ लक्ष देऊन कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# कामगार दिनानिमित्त न.पं. कर्मचाऱ्याचा सन्मान

## विवेक धांडे यांच्या हस्ते विशेष सन्मान



जन सम्राट टाईम्स

**शेंदुर्णी | प्रतिनिधी :** महाराष्ट्र दिन आणि जागतिक कामगार दिनाचे औचित्य साधत शेंदुर्णी नगरपंचायतीत कर्तव्यदक्ष कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. नगरपंचायत कार्यालयातील कर्मचारी नमन निकम यांच्या प्रामाणिक, समर्पित आणि उल्लेखनीय कार्याची दखल घेत मुख्याधिकारी विवेक धांडे यांच्या हस्ते त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. नगरपंचायत कार्यालयात आयोजित छोटेखानी कार्यक्रमात हा सन्मान सोहळा पार पडला. यावेळी मुख्याधिकारी विवेक धांडे यांनी नमन निकम यांच्या कार्यपद्धतीचे कौतुक करत, "प्रामाणिकपणा, संयम आणि सेवाभाव यामुळेच एखादा कर्मचारी संस्थेचा आदर्श ठरतो," असे गौरवोद्गार काढले. नमन निकम हे नगरपंचायतीत अत्यंत शांत, संयमी आणि सोज्वळ व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. "जिथे कमी, तेथे नमन" अशी त्यांची कार्यशैली असल्याने सहकारी कर्मचारी आणि नागरिकांमध्ये त्यांच्याबद्दल विशेष आदर व्यक्त केला जातो. विशेष म्हणजे, विविध शासकीय कार्यक्रम, जनजागृती मोहीम, स्वच्छता अभियान तसेच नगरपंचायतीच्या सूचना व आवाहनांचे प्रभावी ध्वनिक्षेपण करण्याची जबाबदारी ते अत्यंत मनापासून पार पाडतात. आपल्या गोड आणि स्पष्ट आवाजातून ते शहरातील नागरिकांपर्यंत महत्त्वाचे संदेश पोहोचवत असतात. शहर स्वच्छता राखणे, नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि नगरपंचायतीच्या कामकाजात तत्परतेने सहभाग घेणे यामुळे त्यांचे कार्य अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. या सन्मानामुळे नगरपंचायत कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, "कामाची प्रामाणिक दखल घेतली जाते," हा सकारात्मक संदेश प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# दुसऱ्यांच्या घरी भांडी घासणारी महिला झाली आमदार!

## मला माझ्या मतदारसंघातील गरिबांसाठी आणि महिलांसाठी काम करायचे : कलिता माजी

जन सम्राट टाईम्स

**कोलकाता | विशेष प्रतिनिधी** चिकाटी आणि लोकशाहीवरचा विश्वास असेल, तर एखादी सामान्य व्यक्ती किती मोठी झेप घेऊ शकते, याचे जिवंत उदाहरण म्हणजे कलिता माजी. पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकीच्या निकालात अनेक दिग्गजांचा पराभव झाला असला, तरी औसग्राम विधानसभा मतदारसंघातून निवडून आलेल्या कलिता माजी यांची गोष्ट आज संपूर्ण देशासाठी कौतुकाचा आणि प्रेरणेचा विषय ठरली आहे. काही काळापूर्वीपर्यंत कलिता माजी यांचे आयुष्य अत्यंत साधे आणि कष्टप्रद होते. त्या दुसऱ्यांच्या घरी धुणी-भांडी करण्याचे काम करायच्या. महिन्याकाठी त्यांना अवघे २,५०० रुपये मिळायचे. त्यांचे पती प्लंबर म्हणून काम करतात. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत राहणाऱ्या कलिता यांनी कधी स्वप्नातही विचार केला नव्हता की, ज्या हातांनी त्यांनी आयुष्यभर इतरांच्या घरची भांडी घासली, तेच हात एके दिवशी विधानसभेत जनतेचे प्रश्न मांडतील. भाजपने जेव्हा



त्यांना औसग्राममधून उमेदवारी जाहीर केली, तेव्हा अनेकांसाठी तो आश्चर्याचा धक्का होता. पण कलिता डगमगल्या नाहीत. प्रचारादरम्यानही त्यांचा साधेपणा उठून दिसत होता. कोणतेही मोठे लवाजमे नसताना, घरोघरी जाऊन त्यांनी लोकांशी संवाद साधला. "मी तुमच्यातीलच एक आहे आणि तुमचे प्रश्न मला ठाऊक आहेत," हा त्यांचा प्रामाणिकपणा मतदारांच्या मनाला भिडला. आज त्यांनी केवळ निवडणूक जिंकली नाही, तर प्रस्थापित राजकारण्यांना लोकशाहीची खरी ताकद काय असते, हे दाखवून दिले आहे." सध्या अनेक शहरांमध्ये 'निर्माल्य रथ' किंवा 'कलश गाडी'च्या माध्यमातून हा प्रश्न प्रभावीपणे सोडवण्यात आला आहे. त्याच धर्तीवर नशिराबादमध्येही अशी योजना राबवण्याची मागणी होत आहे.

### लोकशाहीचा विजय

कलिता माजी यांचा विजय हा केवळ एका जागेचा विजय नसून, तो सामान्य माणसाच्या संघर्षाचा सन्मान आहे. एका झोपडीत राहणारी आणि घरकाम करणारी महिला जेव्हा राज्याच्या सर्वोच्च सभागृहात पोहोचते, तेव्हा तो लोकशाहीचा सर्वात मोठा उत्सव ठरतो. "मला आता माझ्या मतदारसंघातील गरिबांसाठी आणि महिलांसाठी काम करायचे आहे," अशी भावना त्यांनी विजयानंतर व्यक्त केली आहे. कलिता माजी यांची ही यशोगाथा सांगते की, तुमची पार्श्वभूमी काय आहे यापेक्षा तुमची ध्येयाप्रती असलेली निष्ठा तुम्हाला